महाराष्ट्र पोलीस

# पोलीस आयुक्तालय,
# मिरा-भाईंदर,वसई-विरार

सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/मि.भा.व.वि./आस्था-१/पोशि भरती-२०२२-२३/मै.चा.बदल/ 06 /२०२४ दि. 21 /०६/२०२४

प्रति,

मा.व्यवस्थापक
महा.आय.टी. ,
महाराष्ट्र राज्य ,मुंबई

संदर्भ :- अपोमसं.प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.अपोमंस/प्रशिक्षण/ पोशिभरती/२०२२-२३/१७३/२०२३, दि.०६/०६/२०२४

विषय :- पावसाळाच्या पार्श्चभुमीवर मिरा-भाईंदर वसई-विरार, पोलीस घटकाच्या मैदानी चाचणीच्या वेळापत्रकात बदल केलेबाबत.

-------oooo-------

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस शिपाई प्रक्रियेच्या मैदानी चाचणी दि.१९/०६/२०२४ ते २६/०६/२०२४ या कालावधीत नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर (पश्चिम) येथे घेण्यात येत आहे. त्याबाबतचे सविस्त वेळापत्रक यापुर्वी आपले कार्यालयास सादर करण्यात आलेले आहे.

परंतु मैदानी चाचणीच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच दि.१९/०६/२०२४ रोजी भाईंदर परिसरात पहाटे पासुन पावसाची संततधार सुरु असल्यामुळे मैदानी चाचणीचे मैदान पुर्णपणे निसरडे झाले. त्यामुळे ओल्या मैदानावर उमेदवारांची शारिरीक चाचणी घेणे शक्य झाले नाही. नमुद दिवशी आलेल्या उमेदवारांची केवळ कागदपत्रे पडताळणी व शारिरीक मोजमाप (छाती व उंची) घेवुन त्यांना जावु देण्यात आलेले आहे. त्यामुळे पावसाच्या कारणास्तव यापुर्वीच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असुन शारिरीक चाचणीचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच यापुर्वीचे शारिरीक चाचणीसाठी असलेले नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान शारिरीक चाचणीकरीता अयोग्य असल्याने नविन मैदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | यापुर्वीचा मैदानी चाचणीचा दिनांक | पुरुष,महिला, माजी सैनिक | नव्याने निश्चित केलेला मैदानी चाचणीचा दिनांक | उपस्थित राहण्याऱ्या उमेदवारांची संख्या | शारिरीक चाचणी घेण्यात येणाऱ्या मैदानाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 19/06/2024 | पुरुष | 26/06/2024 | 409 | पोलीस मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार, पत्ता - बेवर्ली पार्क पोलीस मुख्यालय, बेथनी चर्च चे बाजूला, बेवर्ली पार्क पोलीस चौकी समोर, पुनम गार्डन रोड मिरारोड पुर्व 401107 |
| 2 | 20/06/2024 | पुरुष | 27/06/2024 | 1500 | |
| 3 | 21/06/2024 | पुरुष | 28/06/2024 | 1516 | |
| 4 | 22/06/2024 | पुरुष | 29/06/2024 | 1500 | |
| 5 | 23/06/2024 | पुरुष | 30/06/2024 | 1185 | |

कृपया सदर सुधारित वेळापत्रकाप्रमाणे मैदानी चाचणीस हजर राहणेबाबत उमेदवारांना महाआयटी.मार्फत एसएमएस पाठवुन कळविण्याची कार्यवाही होणेस विनंती आहे. सदरचे वेळापत्रक पोलीस आयुक्त,मिरा-भाईंदर, वसई-विरार संकेतस्थळावर **mbvv.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असुन इकडील कार्यालयाच्या मार्फत देखील उमेदवारांना एसएमएस व्दारे माहिती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**(श्रीकांत पाठक)**
अपर पोलीस आयुक्त
पोलीस आयुक्त, मि.भाव.वि.

Scanned with OKEN Scanner